International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मानवी हक्क (Human Rights)

**सविता राधा तानाजी घोगरे[1], सलमा अब. सत्तार[2]**

*[1]पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर*

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

*[2]जेएटी महाविद्यालय मालेगाव, नाशिक*

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

*Corresponding Author – सविता राधा तानाजी घोगरे*

**DOI - 10.5281/zenodo.18655270**

**प्रस्तावना (Introduction):**

मानवी हक्क प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार देतात, त्यांना त्यांच्या सुप्त गुणांना विकास करण्याची संधी देतात एक न्यायपूर्ण व समाजाची शांततापूर्ण निर्मिती करण्यास मदत करतात. म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जन्माने मिळणारे मूलभूत अधिकार जे वैश्विक, अविभाज्य आणि नैसर्गिक असतात.वंश,धर्म किंवा इतर कोणत्याही फरका शिवाय  सर्व मानवांना मूलभूत हक्क आहेत ज्यात जगण्याचा स्वातंत्र्याचा, शिक्षणाचा आणि समानतेचा हक्क तसेच गुलामगिरी आणि छळापासून मुक्तीचा अधिकार  जे सर्वत्र सर्वांसाठी समान आहेत कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेद्वारे हिरावून घेतले जाऊ शकत.हे हक्क सार्वत्रिक, अविभाज्य आणि परस्परावलंबित असतात,जे मानवी प्रतिष्ठा आणि सन्मानासाठी आवश्यक आहेत.

मानवी हक्क ही संकल्पना विसाव्या शतकामध्ये उदयास आली. अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर बॉम्ब टाकल्यामुळे जपानची अपरिमित हानी झाली होती. लक्षावधी जीवितहानी मोठ्या प्रमाणावर झाली होती. युद्धातील या मानवहानीमुळे अनेक मानवतावादी तज्ञ, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ पुढे आले. यातून एकच प्रश्न निर्माण झाला की, एक राष्ट दुसऱ्या राष्ट्राच्या जीवावर का उठते? संपूर्ण जगाला या प्रश्नावर चर्चा करण्यास भाग पाडले. पुढे संयुक्त राष्ट्र संघाने पुढाकार घेऊन मानवी कृतीला आळा घालण्यासाठी मानवी हक्काचा सार्वभौमिक जाहीरनामा  सादर केला.

**संशोधनाचा उद्देश (Objectives):**

1. मानवी हक्कांची संकल्पना, वैशिष्ट्ये आणि प्रमुख प्रकार (जीवन जगण्याचा हक्क, स्वातंत्र्य, शिक्षण, काम, न्याय, आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक हक्क) समजावून घेणे.
2. भारतीय संविधानातील मानवी हक्कांच्या प्रतिबिंबाचा (मूलभूत हक्क, राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वे) अभ्यास करणे.
3. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी कार्यरत संस्था व कायदे (संयुक्त राष्ट्र, UDHR-1948, मानवाधिकार आयोग, 1993 चा कायदा) यांचा आढावा घेणे.
4. मानवी हक्कांचे सार्वत्रिक, अविभाज्य आणि परस्परावलंबी स्वरूप प्रत्यक्ष उदाहरणांसह स्पष्ट करणे.

5. मानवी हक्कांचा व्यक्तीच्या सन्माननीय, न्याय्य व सर्वांगीण (शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक) विकासावर होणारा परिणाम विशद करणे.

**गृहीतके (Hypotheses):**

1. मानवी हक्क सार्वत्रिक, अविभाज्य आणि परस्परावलंबी असल्यामुळेच व्यक्तीच्या सन्माननीय जीवनाची पायाभरणी करते.
2. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे ही मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्याशी सुसंगत आहेत.
3. जीवन, स्वातंत्र्य, शिक्षण, काम, न्याय आणि आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक हक्कांचे संरक्षण झाले तर व्यक्तीचा सर्वांगीण विकास अधिक प्रभावीपणे घडतो.
4. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कायदे आणि संस्था (UN, UDHR, NHRC इ.) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक आणि उपयुक्त ठरतात.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

या संशोधनासाठी प्रामुख्याने सिद्धांताधारित (theoretical) व वाङ्मयाधारित (literature-based) अभ्यास पद्धतीचा वापर करण्यात आला. उदाहरणार्थ, दुय्यम स्त्रोतांचा अभ्यास, संयुक्त राष्ट्राचा Universal Declaration of Human Rights (UDHR-1948), मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993, दस्तऐवजी विश्लेषन ,कायदे, जाहीरनामे, अधिकृत अहवाल यांचा आशय विश्लेषण (content analysis).

वर्णनात्मक (descriptive) व स्पष्टीकरणात्मक (explanatory) पद्धतीचाही वापर या संशोधनासाठी करण्यात आला.

**मुख्य संकल्पना (Key Concept):**

1) मानवी मानवी हे वंश,जात,धर्म,लिंग किंवा राष्ट्रीयत्वावर आधारित नसतात, ते प्रत्येकाला समान मिळतात. किंबहुना प्रत्येक व्यक्तीचा तो जन्मजात हक्क आहे व तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.
2) महत्त्वाचे हक्क –जीवनाचा अधिकार, यातनापासून मुक्ती, गुलामगिरीतून मुक्ती, भाषण स्वातंत्र्य,विचार आणि धार्मिक स्वातंत्र्य.
3) मानवी हक्क हे केवळ कायदेशीर नसून सामाजिक,सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक स्तरावरही लागू होतात.
4) मानवी हक्क संदर्भात भारतीय संविधानाने मूलभूत हक्क भाग 3 आणि मार्गदर्शक तत्वे मार्गदर्शक तत्वे भाग चार यामध्ये प्रतिबिंबित केले आहेत. भारताने मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्याच्या निर्मितीमध्येही भाग घेतला आहे.

**मानवी हक्काची प्रमुख वैशिष्ट्ये:**

1) सार्वत्रिक(universal)- मानवी हक्क हे जगातील सर्व लोकांसाठी सर्व जाती,धर्म, पंथ असा कोणताही भेदभाव न करता सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत.
2) अविभाज्य (unalienable)- मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय मिळालेले आहेत ते कोणत्याही परिस्थितीत

कोणाकडूनही हिरावून हिरावून घेतले जाऊ शकत नाहीत.

3) परस्परावलंबी (inter-related)- कोणतेही दोन हक्क एकमेकांवर अवलंबून असू शकते किंवा एका हक्काची पूर्तता दुसरा हक्कावर अवलंबून असू शकते. उदा- शिक्षणाचा हक्क आरोग्याच्या हक्कासाठी तितकाच महत्त्वाचा आहे.
4) समानता आणि भेदभावाचा अभाव –(equality and non-discrimination) कोणत्याही जाती, धर्माची, वंशाची परंपरेची असेल तरी त्यांना व्यक्ती म्हणून समान वागणूक मिळायला हवी.

**संस्था आणि कायदे (Institutions And Laws):**

1) संयुक्त राष्ट्र (united nations) जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र हि संयुक्त राष्ट्र कार्यरत आहे.
2) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग(NHRC) मानवी हक्काचे रक्षण आणि अंमलबजावणी नारी संस्था आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा
3) मानवी हक्क संरक्षण कायदा,1993( protection of human rights Act, 1993) मानवी हक्क व त्यांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण कायदा.
4) मानवाधिकार दिवस (human rights day) 10 डिसेंबर रोजी लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल हा दिवस मानवाधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो.
5) युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राइट्स (UDHR) 1948 रोजी मानवाधिकाराचा जागतिक जाहीरनामा सादर केला गेला.

**भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेले मानवी हक्क:**

1) जीवनाचा हक्क-Right to live life- या हक्कांमुळे प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा तसेच स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार प्रत्येक भारतीय नागरिकाला दिलेला आहे.
2) स्वातंत्र्याचा हक्क(right to freedom )कोणतीही व्यक्ती कोणाचाही गुलाम नाही तसेच तिचा कोणीही छळ करू शकत नाही हे स्वातंत्र्य संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला बहाल केले आहे. प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले गेले आहे.
3) शैक्षणिक हक्क(right to education) प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार भारतीय संविधानाने दिला आहे.
4) कामाचा अधिकार(right to work) प्रत्येक भारतीय व्यक्ती कोणत्याही ठिकाणी काम करू शकते. योग्य कामाची निवड करण्याचा हक्क संविधानाने भारतीय नागरिकांना दिला आहे. कोणत्याही व्यक्तीला समान कामासाठी समान वेतन देणे हा त्याचा हक्क आहे.
5) न्यायाचा हक्क (right to justice) प्रत्येक भारतीय व्यक्तीला अत्याचारावर अथवा अन्यायावर न्याय मिळवण्याचा तसेच निष्पक्ष सुनावणीचा अधिकार आहे.
6) आर्थिक,सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क (economic, social and cultural right) प्रत्येक सन्माननीय जीवन जगण्याचा आहे. आपल्या देशाचा संस्कृतीचा सामाजिक व सांस्कृतिक वारसा जपण्याचा अधिकार आहे.

**निष्कर्ष:**

मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी बळ देतात. कोणत्याही भेदभावाशिवाय जगण्याचे तसेच न्यायिक हक्कामुळे आपला शारीरिक,मानसिक तसेच आर्थिक व सामाजिक विकास करणे शक्य आहे.

**संदर्भ:**


1) भारतीय भारतीय मानवी हक्क आणि अधिकार हक्क आणि अधिकार - र. घ. वराडकर-निराली प्रकाशन
2) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय. पी. के. कुलकर्णी
3) मानवी हक्क म्हणजे काय? विकास कुचेकर श्रीकांत जोगदंड,श्रीकांत जोगदंड
4) मानवी हक्क आणि माहितीचा अधिकारमानवी हक्क- डॉक्टर संदीप काळे
5) मानवी हक्क- डॉ. वा. भा पाटील
6) मानवी हक्क- श्री महेश शिंदे, ज्ञानदीप अकॅडमी